# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः10.02.2026** **वारःमंगळवार**

---

**ठळक बातम्या**

- **भारत आणि सेशेल्स दरम्यान विविध क्षेत्रांमधील सामंजस्य करार; भारताकडून सेशेल्सला १७ कोटी ५० लाख डॉलर्सच्या विशेष आर्थिक मदतीची घोषणा.**
- **पंतप्रधान नरेंद्र मोदीं आणि मॉरिशसचे पंतप्रधान डॉ. नविनचंद्र रामगुलाम यांच्यात दूरध्वनीवरून चर्चा**
- **महाराष्ट्रातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकांचे निकाल जाहीर, बहुतांश जिल्हा परिषदांवर भाजपा-महायुतीचं वर्चस्व.**

**आणि**

- **टी-20 विश्व चषक क्रिकेट स्पर्धेत आज नेदरलँड - नामीबिया यांच्यात दिल्लीत तर न्यूझीलंड – यूएई यांच्यात चेन्नईमध्ये लढत**

**आता सविस्तर बातम्या**

**सेशेल्स**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सेशेल्ससाठी १७ कोटी ५० लाख डॉलर्सच्या विशेष आर्थिक मदतीची काल घोषणा केली. नवी दिल्लीत सेशेल्सचे राष्ट्राध्यक्ष डॉक्टर पॅट्रिक हर्मिनी यांच्याशी झालेल्या भेटीनंतर संयुक्त पत्रकार परिषदेत मोदी यांनी ही घोषणा केली. या आर्थिक मदतीमुळे सामाजिक गृहनिर्माण, ई-मोबिलिटी, व्यावसायिक प्रशिक्षण, आरोग्य, संरक्षण आणि सागरी सुरक्षेला पाठिंबा मिळेल, असं पंतप्रधान मोदी यावेळी म्हणाले. याप्रसंगी भारत आणि सेशेल्स दरम्यान आरोग्य, हवामानशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान आणि सुशासन यासह विविध क्षेत्रांमधील सात सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्यात आली.

पंतप्रधान मोदी आणि राष्ट्राध्यक्ष हर्मिनी यांनी दोन्ही देशांमधील सहकार्य अधिक दृढ करण्यास आणि संसदीय देवाणघेवाण वाढवण्यास सहमती दर्शवली असून संस्कृती, पर्यटन, शिक्षण आणि युवा सहभाग या क्षेत्रांमध्ये संस्थात्मकरित्या सहकार्य स्थापित करण्यासही सहमती झाली आहे,असं परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी सांगितलं.

**राष्ट्रपती**

भारत आणि सेशेल्स यांचे संबंध परस्पर विश्वासावर आधारित आहेत, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. त्या काल राष्ट्रपती भवनात सेशेल्सचे राष्ट्राध्यक्ष पॅट्रिक हर्मिनी यांच्या सन्मानार्थ आयोजित स्नेह भोजनाच्यावेळी बोलत होत्या. भारताच्या 'महासागर' धोरणात सेशेल्सला महत्त्वाचे स्थान आहे. असंही राष्ट्रपती मुर्मू म्हणाल्या.

**'परीक्षा पे चर्चा'**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'परीक्षा पे चर्चा २०२६' च्या नवव्या आवृत्तीच्या दुसऱ्या भागात काल सकाळी देशभरातील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या भागात मोदी यांनी परीक्षांदरम्यानचा ताण आणि चिंता यावर मात कशी करावी याबद्दल मार्गदर्शन केलं. तसंच जीवन कौशल्ये, खेळ, सर्जनशीलता आणि आत्म-विकासावर लक्ष केंद्रित करण्यासाठीही त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित केलं. अभ्यास आणि आवड यांच्यात संतुलन राखलं पाहीजे असं सांगत, कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाला घाबरण्याची गरज नाही असंही मोदी यांनी विद्यार्थ्यांना सांगितलं. शिस्तीची गरज अधोरेखित करत त्यांनी नागरी कर्तव्य आणि त्यांच्या महत्त्वावरही भर दिला.

**पंतप्रधान मॉरीशस**

पंतप्रधान नरेंद्र मोदीं यांनी काल मॉरिशसचे पंतप्रधान डॉ. नविनचंद्र रामगुलाम यांच्याशी दूरध्वनीवर संभाषण केले.या संभाषणादरम्यान दोन्ही नेत्यांनी या दोन देशांना जोडणाऱ्या विशेष, ऐतिहासिक आणि जनकेंद्रित संबंधांना बळकटी देण्याचा आपला संकल्प पुन्हा एकदा व्यक्त केल्याचं मोदी यांनी समाजमाध्यमांवरील संदेशात म्हटलं आहे. दोन्ही नेत्यांनी यावेळी व्यापक सहकार्यातल्या प्रगतीचा आढावा घेतला. पुढील आठवड्यात दिल्लीत होणाऱ्या कृत्रिम बुद्धिमत्ता शिखर संमेलनासाठी डॉ.रामगुलाम यांचं स्वागत करण्यास उत्सुक असल्याचंही मोदी यांनी सांगितलं.

**जिल्हा परिषद निवडणूक**

महाराष्ट्र राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकांचे निकाल काल जाहीर करण्यात आले. या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने बाजी मारली आहे. १२ पैकी ६ जिल्हा परिषदांमध्ये भाजपाला सर्वाधिक जागा मिळाल्या आहेत. जिल्हा परिषदेच्या राज्यातल्या एकंदर ७३१ जागांपैकी २२५ जागांवर भाजपानं विजय मिळवला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसला १६५, तर शिवसेनेला १६२ जागांवर यश मिळालं. काँग्रेसला ५५, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला २६, तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला ४३ जागा मिळाल्या.

१२५ पंचायत समित्यांमधील एकंदर १ हजार ४६२ जागांपैकी सर्वाधिक ४५९ जागा भाजपानं जिंकल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसला ३०६, शिवसेनेला ३०२, काँग्रेसला ९७, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला ८९, तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला ४६ जागा मिळाल्या आहेत.

सातारा, सोलपूर, छत्रपती संभाजी नगर, परभणी, सिंधुदुर्ग आणि धारशिवमध्ये भाजपाने सर्वाधिक जागा जिंकल्या आहेत. पुणे आणि कोल्हापूरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस, रत्नागिरी आणि रायगडमध्ये शिवसेना, सांगलीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष तर लातूरमध्ये काँग्रेसला सर्वाधिक जागा मिळाल्या आहेत.

पुणे जिल्हा परिषदेत ७३ पैकी ५१ जागा जिंकून राष्ट्रवादी काँग्रेसने वर्चस्व राखलं आहे.

**मोदी-कौतुक**

महाराष्ट्रातील जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये भाजप आणि महायुतीच्या घवघवीत यशाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनतेचे आभार मानले आहेत. महाराष्ट्राच्या ग्रामीण आणि शहरी भागातील जनतेला सुशासन आणि राज्याच्या गौरवशाली संस्कृतीच्या भावनेनं काम करणारी युती हवी आहे, असं मोदी यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**प्रतिक्रिया**

या यशातून सरकारनं केलेल्या कामावर जनतेनं शिक्कामोर्तब केल्याचं स्पष्ट होत असल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत वार्ताहरांशी बोलताना दिली.

हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात.

**कृषीमंत्री**

भारत-अमेरिका व्यापार करार हा राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनं सर्वोत्तम करार असून यामध्ये शेतकऱ्यांच्या हिताचं पूर्णपणे संरक्षण करण्यात आलं आहे, असं मत केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी व्यक्त केलं. ते काल उत्तर प्रदेशातल्या मथुरा शहरात गोवर्धन परिक्रमेनंतर माध्यमांशी बोलत होते. देशातील शेतकरी, महिला आणि तरुणांच्या स्वप्नांना हा करार नवी उभारी देईल, असंही कृषी मंत्री म्हणाले.

**अमित शहा**

केंद्रीय गृह मंत्री अमित शाह आज नवी दिल्लीत आयोजित राष्ट्रीय परिषदेमध्ये सायबर फसवणूक प्रतिबंध या विषयावर भाषण देणार आहेत. यावेळी केंद्रीय अन्वेषण विभागाच्या नवीन सायबर गुन्हे शाखेचं उद्घाटन त्यांच्या हस्ते होणार आहे. तसंच ते गृहमंत्रालया अंतर्गत भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्राच्या राज्य डॅशबोर्डचे ते उदघाटन करतील. या दोन दिवसांच्या परिषदेत

केंद्रीय आणि राज्य कायदा अंमलबजावणी संस्था, दूरसंचार विभाग, आर्थिक सेवा विभाग आणि भारतीय रिझर्व्ह बँकेचे वरिष्ठ अधिकारी आणि तज्ज्ञ सहभागी होणार आहेत.

**<u>अर्थमंत्री</u>**

२०२६-२७ चा केंद्रीय अर्थसंकल्प व्यवसाय आणि उद्योगांसाठी धोरणात्मक दृष्टिकोनातून सातत्य, निश्चिततेबद्दल सरकारची वचनबद्धता दर्शवतो,असं अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. त्या काल नवी दिल्लीत भारत-अमेरिका धोरणात्मक भागीदारी मंचाच्या संचालक मंडळाच्या सदस्यांना संबोधित करताना बोलत होत्या. यावेळी अर्थमंत्र्यांनी सेमीकंडक्टर, इलेक्ट्रॉनिक घटक उत्पादन, बायो फार्मा शक्ती, दुर्मिळ पृथ्वी खनिजांचे कॉरिडॉर यांसारख्या क्षेत्रांमधील सुधारणांशी संबंधित घोषणांवरही प्रकाश टाकला.पारंपरिक औद्योगिक क्लस्टर्सच्या आधुनिकीकरणावर विशेष भर दिला जात आहे,असंही निर्मला सीतारामन यांनीनमूद केलं.

**<u>डिफेन्सशो</u>**

भारताचे संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ यांनी काल रियाध इथं आयोजित जागतिक संरक्षणप्रदर्शनाच्या निमित्तानं सौदी अरेबियासंरक्षण मंत्रालयातील कार्यकारी व्यवहार सहाय्यक मंत्री डॉ. खालेद बिन हुसेन अल-बियारी यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान भारत-सौदी अरेबिया धोरणात्मक भागीदारी मजबूत करण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आली.तसंच या बैठकीतदोन्ही देशांमधीलसंरक्षण सहकार्य वाढवणे, आंतर-सेवा संबंधांचा विस्तार करणं आणि संरक्षण व सुरक्षा क्षेत्रांमध्ये सहकार्य अधिक दृढ करण्याविषयीचर्चा करण्यात आल्याचं संरक्षण मंत्रालयानं सांगितलं.

**<u>ब्रिक्स शेरपा बैठक</u>**

BRICS शेरपांची पहिली बैठक काल नवी दिल्ली मध्ये सुरू झाली. भारताच्या अध्यक्षतेत होत असलेल्या आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लोककेंद्री आणि मानवतावादी दृष्टिकोनावर आधारित या संमेलनातल्या प्राधान्यक्रमांची माहिती भारताचे आर्थिक संबंध सचिव आणि भारताचे BRICS शेरपा सुधाकर दलेला यांनी यावेळी दिली. नवोन्मेष, सहकार्य आणि शाश्वतता यावर आधारित संकल्पनेवरत्यांनी भर दिला. भारत यंदा चौथ्यादा BRICS चे अध्यक्षपद भूषवणार आहे, याआधी भारतानं 2012, 2016 आणि 2021 मध्ये अध्यक्षपद सांभाळले होतं.

**<u>रशिया ब्रिक्स</u>**

दरम्यान, भारताच्या ब्रिक्सच्या अध्यक्षपदाला रशियाचा सक्रियपणे पाठिंबा असेल असं सांगत भारताचं धोरणं आधुनिक आणि अत्यंत समर्पक असून त्यात दहशतवादविरोधी आणि ऊर्जा सुरक्षेवर लक्ष केंद्रित केलं आहे, असं मत रशियाचे परराष्ट्र मंत्री सर्गेई लावरोव्ह यांनी व्यक्त केलं. लावरोव्ह यांनी अन्न, ऊर्जा आणि माहिती तंत्रज्ञान सुरक्षेच्या महत्त्वावरही जोर दिला.

**<u>आयसीसीटी-20–क्रिकेट</u>**

पुरुषांच्या आयसीसी टी-20 विश्व चषक क्रिकेट स्पर्धेत आज नेदरलँड आणि नामीबिया या संघांमध्ये लढत होणार आहे. दिल्लीतल्या अरुण जेटली स्टेडियम मध्ये सकाळी 11 वाजता सामना सुरु होईल. दूसरा सामना चेन्नईमध्ये न्यूझीलंड आणि संयुक्त अरब अमीराती यांच्यात दुपारी 3 वाजता खेळला जाईल. तर तिसरा सामना संध्याकाळी 7 वाजता ,पाकिस्तान आणि अमेरिका यांच्या दरम्यान कोलंबोतल्या के सिंहली स्पोर्ट्स क्लब इथं होणार आहे. कोलंबो मध्ये झालेल्या ग्रुप बी च्या सामन्यात झिम्बाब्वेनं ओमान संघाचा 8 गडी राखून पराभव केला. तर कोलकाताच्या ईडन गार्डन्स मैदानावर खेळलेल्या ग्रुप सी च्या सामन्यात स्कॉटलँडनं इटलीला 73 धावांनी पराभूत केलं.

शेवटी पुन्हा ठळक बातम्या

- भारत आणि सेशेल्स दरम्यान  विविध क्षेत्रांमधील सामंजस्य करार; भारताकडून सेशेल्सला १७ कोटी ५० लाख डॉलर्सच्या विशेष आर्थिक मदतीची घोषणा.
- पंतप्रधान नरेंद्र मोदीं मॉरिशसचे पंतप्रधान डॉ. नविनचंद्र रामगुलाम यांच्यात दूरध्वनीवरून चर्चा
- महाराष्ट्र राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकांचे निकाल जाहीर, बहुतांश जिल्हा परिषदांवर भाजपा-महायुतीचं वर्चस्व.
- आणि
- टी-20 विश्व चषक क्रिकेट स्पर्धेत आज नेदरलँड - नामीबिया यांच्यात दिल्लीत तर न्यूझीलंड – यूएई यांच्यात चेन्नईमध्ये लढत

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**